

संस्कृत साहित्य सरिता

# किरातार्जुनीय

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा.
दा. क्र. ५४५२



IRBK-0105452
IRBK-0105452

४८५२

संस्कृत साहित्य सरिता : २२

४८५२
आ.वा.

भारवी-कृत

# किरातार्जुनीय

२०८५५

कथासार

ल. द. बेंबळकर

बी. ए. (ऑनर्स), बी. टी., काव्यतीर्थ



IRBK-0105452
IRBK-0105452

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अॅन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
नरहर शंभुराव कुलकर्णी
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७ शनिवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ' संस्कृत-साहित्य-सरिता ' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्हीं योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार ? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

# परिचय

'किरातार्जुनीय' काव्याचा कर्ता भारवि हा इ. स. च्या सातव्या शतकांत होऊन गेला, असें समजतात. 'दशकुमार-चरिता'चा कर्ता दंडि हा याचा नातू. भारवीचें हें एकच काव्य आज उपलब्ध आहे.

या कवीचें हें काव्य अत्यंत सरस असें असलें, तरी तें दुर्बोध आहे. काव्याचा प्रसंग राजनीतिपर कल्पून सर्व नीतिशास्त्राचाच ऊहापोह प्रथम तीन सर्गांत केलेला आहे. महाकाव्याला लागणारीं पर्वत, ऋतु, शृंगार, लढाई इत्यादि प्रसंगांचीं वर्णनें समयोचित असून कवीची प्रतिभा स्वतंत्र आहे, हें सिद्ध करण्यास तीं पुरेशीं आहेत. या काव्यांत कवीनें शब्दश्लेष आणि निरनिराळी बंधरचना करून आपलें शब्दसामर्थ्य प्रगट केलें आहे.

या काव्याशीं स्पर्धा करण्याच्या हेतूनेंच जणुं महाकवि माघ यानें 'शिशुपालवध' हें काव्य रचिलें.

भारवीचें वैशिष्ट्य म्हणजे अर्थगौरव. अगदीं थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थ सामावणें, असा 'गौरव' शब्दाचा अर्थ आहे. उगीच पाल्हाळिक रचना त्यानें केलेली नाहीं. अर्थासाठीं शब्द थोडे असले, तरी अर्थ समजण्यास तेवढा त्रास होत नाहीं. रचना क्लिष्ट आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

संस्कृतमधील पंचमहाकाव्यांत याची गणना केली गेलेली आहे, तें अगदीं योग्य आहे.

— लेखक

२०९६६
बालवाङ्मय
७२४
२५/१२/५६

# किरातार्जुनीय

पूर्वीं या भरतखंडामध्यें कौरव आणि पांडव हे दोघे चुलत भाऊ राज्य करीत होते. कौरव होते शंभर आणि पांडव होते पांच. त्या दोघांत सख्य नव्हतें.

धृतराष्ट्र हा त्या शंभर कौरवांचा पिता. तो आंधळा होता, म्हणून त्याचें राज्य त्याचा धाकटा भाऊ जो पंडु त्यास दिलेलें होतें. पांडव हे त्याचे पुत्र. पण पंडु हा पंडु-रोगानें पछाडलेला होता. त्या कारणानें तो लौकरच मृत्यु पावला. त्याच्याबरोबर त्याची दुसरी राणी माद्री सती गेली. त्याची पहिली राणी कुंती त्या लहान मुलांचा सांभाळ करीत राहिली. पांडव हे त्याकाळीं फारच लहान होते. धृतराष्ट्रानेंच त्यांचा सांभाळ केला.

कौरव आणि पांडव बरोबर वाढले. त्यांचें शिक्षणहि बरोबरच झालें. ते सर्वजण निरनिराळ्या शस्त्रविद्यांत पारंगत झाले. तरी त्यांच्या त्यांच्या शक्तीप्रमाणें त्या सर्व-जणांत फरक दिसून येणारा होताच. पांडव हे अधिक शूर होते आणि शस्त्रास्त्रविद्यांतहि अधिक निपुण झाले.

पुढें ते मोठे झाल्यावर ‘ गादीवर कोणीं बसावें ’, असा प्रश्न पुढें आला. पंडु जेव्हां मृत्यु पावला, तेव्हां तो राजा होता; अर्थात् राज्य जें मिळणार, तें त्याच्याच मुलांना, हें अगदीं योग्यच होतें. पण पंडु हा लहान भाऊ होता, धृतराष्ट्र हा वडील भाऊ होता. तो आंधळा असल्यानें त्याचें राज्य त्याला नाकारण्यांत आलेलें होतें. आतां त्याचीं मुलें मोठीं झालीं होतीं. कर्तबगारहि होतीं. तेव्हां तें राज्य त्यांसच मिळणें योग्य होतें. प्रश्न गहन झाला. शेवटीं तोड अशी काढली कीं, ‘ पांडवांना अर्धें राज्य द्यावें. दुर्योधन इत्यादिक धृतराष्ट्राच्या मुलांनीं मूळ हस्तिनापुरास राज्य करावें, आणि इंद्रप्रस्थ हें नवीन शहर वसवून तेथें पांडवांनीं राज्य करावें.’ आणि त्याप्रमाणें पांडव बाहेर पडले.

कालांतरानें पांडव प्रबळ झाले. त्यांनीं आपलें राज्य न्यायानें चालविलें. त्यांनीं चारीहि दिशा जिंकून, अपार संपत्ति जमा करून राजसूय यज्ञ केला. सर्व प्रजा त्यांजवर संतुष्ट होती.

पण कौरव मात्र आतां त्यांजवर अत्यंत जळफळूं लागले. राजसूय यज्ञाच्या समाप्तीच्या वेळीं मयसभेंत त्यांचा अजाणतां अपमानहि झालेला होता. ‘ त्याचा सूड घ्यावा ’, असा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला. शेवटीं कपटद्यूताचा प्रयोग करून त्यांनीं पांडवांना हरविलें. त्यांना वनवासांत जावें लागलें.

वनवासांत असतांना पांडव द्वैतवनांत राहात होते. तेथें असतांना हस्तिनापुरांत काय चाललें आहे, तें समजण्यासाठीं युधिष्ठिरानें एका हेराला पाठविलें होतें. तो हेर परत आला आणि त्यानें युधिष्ठिराला हकीकत सांगितली. ( एथपासून 'किरातार्जुनीय' या काव्याला आरंभ झालेला आहे. )

*　　　*　　　*

तो हेर सांगत आहे, "राजा, आम्ही हेर म्हणजे अगदीं खरें खुरें वर्तमान सांगणारे असतों. कारण हेर म्हणजेच राजाचे नेत्र.

"आपल्या मालकांना फसविणें, हा आमचा धर्म नव्हे. तेव्हां माझें सांगणें कसेंहि असो—हितकारक किंवा कठोर—तें तूं ऐकून घ्यावेंस, आणि जें कांहीं योग्य असेल, तें करावेंस. हितकारक आणि गोड भाषण बहुधा दुर्लभच !

"आम्ही हेर अगदीं क्षुद्र. राजे लोकांच्या अंतःकरणांतील निरनिराळे विचार आम्हांला कोठून समजणार ? पण मी तें काम करण्यांत यशस्वी झालों आहें, हा केवळ तुझाच प्रभाव !

"राजा, सांगावयाचें म्हणजे असें कीं, दुर्योधन तुला भीत आहे. तूं अरण्यांत जरी राहात असलास आणि तो जरी सिंहासनाधिष्ठित असला, तरी तो तुझी भीति बाळगीत आहे. त्यानें तुला कपटद्यूतानें जिंकलें आहे, यामुळें त्याचें मन त्यास खात आहे. म्हणून तो ही सर्व पृथ्वी आता न्यायमार्गांनीं पुनः

जिंकण्याची इच्छा करीत आहे. तो आपल्या गुणसंपत्तीचें शुभ्र यश पसरवीत आहे. आपल्यासारख्या सज्जनाशीं विरोध केलेला बरा; कारण त्यामुळें त्यामध्यें अधिक चांगलेपणा निर्माण होत आहे.

"तो आपल्या नातलगांना नीटपणें वागवीत आहे. तो गुणवान् लोकांना दान इत्यादिकांनीं आपलेंसें करून घेत आहे. तो इतका न्यायीपणानें वर्तन करीत आहे कीं, आपल्या मुलाचाहि जरी कांहीं अपराध दिसून आला, तरी तो त्यासहि शिक्षा दिल्यावांचून राहात नाहीं. पक्षपाताचा लवलेशहि त्याच्यांत उरलेला नाहीं.

"आपली भीति वाटत असल्याकारणानें त्यानें स्वतः-भोंवतीं पहारेकरी ठेवलेले आहेत आणि निःशंकपणानें तो इकडे तिकडे वावरत आहे. पुष्कळ राजे लोक आपआपल्या अश्व-गज-रथ इत्यादिक सैन्य-सामग्रीसह त्याच्याकडेच तळ ठोकून राहिले आहेत. त्यानें शेतीची व्यवस्था कालवे काढून नीट केली आहे. त्या कारणानें त्याची प्रजा अत्यंत संतुष्ट झालेली आहे. त्याची कीर्ति दूरवर फांकली आहे. तो अत्यंत दयाशील आहे. ही पृथ्वी जणुं सर्वच कांहीं त्यास आपण होऊन देत आहे.

"मोठे पराक्रमी, कीर्तिशाली, एकनिष्ठ असणारे आणि त्याच्याशीं विरोध न करणारे असे अनेक धनुर्धारी वीर त्यानें मिळविले आहेत. आणि तेहि आपल्या प्राणांचें मोल

देऊन त्याचें प्रिय साधण्याची इच्छा करीत आहेत. त्यानें दुःशासनाला आपला युवराज म्हणून नेमिलेलें आहे. पण इतकें जरी असलें तरी आपलें नांव सहज बोलतां बोलतां जरी कोठें निघालें, तरी लाजून जाऊन तो आपली मान खालीं घालतो. त्याच्या मनाला भयंकर व्यथा होत असते. बलवान लोकांशीं विरोध हा परिणामीं असाच दुःखकारक असतो."

याप्रमाणें भाषण करून तो हेर निघून गेला. तेव्हां राजा युधिष्ठिर द्रौपदीपाशीं आला आणि आपल्या इतर चार भावंडांच्या समोर त्यानें ही सर्व हकीकत सांगितली.

'शत्रूचा अशाप्रकारें उत्कर्ष होत आहे,' हें ऐकल्याबरोबरच द्रौपदी अत्यंत संतापून गेली. तिचा राग तिच्या मनांत मावेना. तेव्हां ती युधिष्ठिराला म्हणाली—

"महाराज, आपणासारख्यांना आम्ही बायकांनीं कांहीं सांगितलें, तर तो अपमान वाटतो. परंतु मी तरी काय करावें ? सर्व स्त्रीधर्म झुगारून देऊन मला झालेला त्रास मला बोलावयास भाग पाडीत आहे. आपणच ही पृथ्वी आपल्या शत्रूला देऊन टाकलीत. इंद्राप्रमाणें तेजसंपन्न असणाऱ्या आपल्या वाडवडिलांनीं तिचें किती तरी काल रक्षण केलेलें होतें.

"महाराज, जे कोणी कपटी लोकांशीं कपटानें वागत नाहींत, त्यांचा पराभव होत असतो. चिलखत घातलें नाहीं,

आणि तशा उघडचा अंगावर बाण पडले कीं ते बाण अंगांत घुसणारच !

" महाराज, आपणाशिवाय दुसरा कोण बरें आपल्या असलेल्या राज्यलक्ष्मीचा त्याग करील? आणि आपल्याला राग तरी कसा येत नाहीं ? एकाद्या वाळून कोळपून गेलेल्या शमीच्या झाडाला अग्नीनें जाळून टाकावें, त्याप्रमाणें आपल्या अंत:करणांत भडका कसा होत नाहीं ? असें पाहा—ज्याला राग नाहीं, त्याचें प्रेम कोणावरहि असत नाहीं आणि त्याच्या-वरहि कोणी प्रेम करीत नाहीं. अत्यंत प्रेमळ माणसेंहि त्याचा तिटकाराच करतात.

" या भीमाकडे पाहा. त्याच्याकडे पाहूनहि तुमच्या अंत:करणांत कांहीं क्लेश उत्पन्न होत नाहींत का? महाराज, रक्तचंदन पायाला लावून घेण्याची ज्याला संवय, त्याला पायींच या अरण्यांत हिंडावें लागत आहे ना ? हा दुसरा अर्जुन पाहा—त्यानें उत्तरकुरु प्रदेश जिंकून तेथून अपार लूट आणिली. तो म्हणजे जणुं दुसरा इंद्रच. पण त्याला वल्कलें परिधान करावीं लागत आहेत ना ? त्याच्याकडेहि पाहून आपल्या मनांत क्रोध उत्पन्न होत नाहीं का ?

" हे नकुल आणि सहदेव. अत्यंत नाजूक आहे यांची देह-यष्टि. पण आतां पाहा. या अरण्यांतील कठीण भूमीवर हिंडून हिंडून यांचें कातडें टणक होऊन गेलेलें आहे. सर्वांगावर केस उगवलेल्या रानवट हत्तीप्रमाणेंच हे आतां

२०९६६
बालवाङ्मय
८२४
२५।७।२४

दिसतात. त्यांच्याकडे आपणास पाहवतें तरी कसें ? माणसांचा स्वभावच मोठा चमत्कारिक असतो. आपणाला आपलें स्वतःचेंहि दुःख जाणवत नाहीं, पण माझ्या मनाला मात्र आपली ही झालेली दुर्दशा पाहून सारखी पीडा होत आहे. पूर्वी आपण मोठ्या मूल्यवान् अशा बिछान्यावर झोंपत असां. आपणांस जागे करण्यास भाट लोक येत असत. त्यावेळीं मंगल वाद्यांचा गजर केला जात असे. आणि आतां आपण या उघड्या जमिनीवर झोंपत आहांत. त्यावरील दर्भ आपणांस रुपत आहेत. आणि आतां हा कोल्ह्या आपली झोंप मोडून आपणांस उठवीत आहेत. आपणांस पूर्वी सुग्रास अन्न प्राप्त होत होतें. ब्राह्मण लोक आपल्या पंक्तीला होते. आणि आतां त्याच आपणाला या रानांतील फळांवर भूक भागवून राहावें लागत आहे. महाराज, आपलें शरीर आणि आपली कीर्ति दोन्ही कृश होत आहेत. त्याहूनहि वाईट वाटण्याचें कारण म्हणजे ही आपली दशा शत्रूंनीं केलेली आहे. आपला पराभव झालेला आहे. आपलें शौर्य ग्रासून टाकलेलें आहे. पराक्रम ग्रासून न टाकणारा पराभवहि उत्सवास कारण होत असतो. कारण पराक्रमाच्या साह्यानें पुनरपि भाग्य-लक्ष्मी मिळवितां येते. आणि तोच पराक्रम नाहींसा झाला तर—? महाराज, शत्रूंना झिडकारूनच, त्यांना खिळखिळे करूनच राजे लोक स्वस्थ होतात. निरिच्छ मुनि मात्र सहनशीलतेनें शांततेची कास धरितात. राजे लोक पराक्रमाची

कास धरितात. आणि आपणांसारख्या पराक्रमी माणसांनींच जर शत्रूंनीं केलेला असला अपमान गिळून टाकला, तर तेजस्वीपणाचा लोपच झाला. तेजस्वितेला कोणी आधारच राहिला नाहीं.

" महाराज, आपण पराक्रम सोडून देऊन जर सहिष्णुतेची कास धरणार असाल, तर जटा वाढवा आणि कायमची यज्ञयागाची क्रिया करीत अरण्यांतच राहा ! हें पराक्रमाचें चिन्ह असणारें धनुष्य कशाला जवळ बाळगीत आहांत ? त्याचाहि त्याग करा आणि बसा अग्नीमध्यें आहुति टाकीत. आपण म्हणाल कीं, मी माझ्या प्रतिज्ञेची वाट पाहात आहें. तेरा वर्षें झाल्यावर मला काय करावयाचें तें मी करीनच ! पण महाराज, जे कोणी लबाड असतात, त्यांच्याशीं करार कसला पाळावयाचा ? ज्या राजांना शत्रूवर विजय मिळविण्याची इच्छा आहे, ते राजे शत्रूच्या करारामध्यें कांहीं तरी दूषण शोधीत असतात. आपणहि तसेंच करावें."

द्रौपदीचें हें तेजस्वी भाषण युधिष्ठिरानें ऐकिलें. भीमानेंहि तें ऐकिलें. आणि तिच्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ तो म्हणाला—

" महाराज, ही मानी द्रौपदी जें कांहीं म्हणाली, तें अगदीं नीतिशास्त्राला धरूनच आहे. औषध थोडकेंसेंच असलें, तरी तें अत्यंत प्रभावी असतें, आणि त्याचा परिणाम दिसून येतोच. तसेंच हें द्रौपदीचें भाषण आहे. महाराज, आपल्या बुद्धीनें सर्व शास्त्रांचा अभ्यास केलेला आहे, तर मग एकादी हत्तीण जशी चिखलांत फसावी, त्याप्रमाणें ती अनिश्चततेंत

कां फसत आहे ? आपल्या श्रेष्ठ पराक्रमाची कुचेष्टा होत आहे, यापेक्षां आणखी काय वाईट घडून येण्यासारखें आहे? शत्रूचा उदय झालेला पाहावा, पण तो जर कालांतरानें त्याचा नायनाट करणारा असेल तर ! पण शत्रूचा होत असणारा क्षय, जरी क्षुद्र असा असला, तरी जर तो त्यास उत्कर्षास नेणारा असेल, तर त्याची मुळींच उपेक्षा करूं नये. लोकांच्या निंदेकडे लक्ष देत राहिलें, तर ज्याप्रमाणें संपत्ति सोडून जाते, त्याप्रमाणें जो कोणी शत्रूच्या उदयाकडे लक्ष न देतां स्वस्थ बसतो त्याचाहि नाशच होत असतो. अभिमानी पुरुषांना आपला पराक्रम हाच मोठा आधार असतो. तोच सर्वनाशापासून थोपवून धरण्यास समर्थ असतो. जो कोणी पराक्रम करीत नाहीं, त्यावर आपत्ती कोसळत असतात. या आपत्तींच्या फेऱ्यांत एकदां तो सांपडला कीं त्याचा उत्कर्ष थांबूनच राहतो. ज्याला भविष्यकाळ नाहीं त्याला नीचपणा प्राप्त होत असतो, आणि जो कोणी मोठा नाहीं, तो राज्यश्रीचें स्थान नाहीं. तर जिनें या शत्रूचा उत्कर्षच होत आहे, अशी ही निष्क्रियता आपण सोडून द्यावी. आपण प्रतिज्ञापूर्तीची वाट पाहात आहांत, ‘तेरा वर्षें पूर्ण झालीं, म्हणजे हा दुर्योधन आपलें राज्य आपणांस परत देईल,’ अशी आपण खात्री बाळगीत आहांत. पण ज्यानें त्या राज्यलक्ष्मीचा चिरकाल उपभोग घेतला आहे, त्याला तिला सोडावें, असें कसें वाटेल ? आपल्या भावंडांच्या पराक्रमाचा मग उपयोग तरी काय ?

"अभिमानी माणसांना प्राणांची पर्वा नसते. प्राण हे नश्वर असतात. त्यांच्या मोबदल्यांत, चिरकालीन कीर्ति मिळवावयाची असते. आणि तें यश मिळवीत असतांना जी लक्ष्मी प्राप्त होत असते, तें केवळ योगायोगानेंच प्राप्त झालेलें फळ होय. ढग गडगडाट करीत असतांना सिंह कां बरें चवताळून जात असतो ? मोठ्या लोकांचा हा स्वभावच की त्यांना दुसऱ्याचा उत्कर्ष सोसवतच नाहीं. तर आपण पराक्रमाचीच कांस धरावी."

भीमाचें हें भाषण ऐकून युधिष्ठिर त्याचें सांत्वन करीत म्हणाला–

"बाळ भीमा, तूं म्हणतोस तें सर्व खरें आहे, तें सर्व नीतिशास्त्रास धरून आहे. पण मला असें वाटतें कीं कोणतीहि क्रिया नीट विचार करूनच करावी. आततताईपणानें कोणतीहि क्रिया करूं नये. जे कोणी विचार करूनच आपलें कार्य पार पाडीत असतात, त्यांनाच लक्ष्मी माळ घालीत असते. जो कोणी आपलीं कृत्यें नीट विचारांचें पाणी घालून करीत असतो, त्याला शरद्ऋतूंत जसें नीट पेरलेलें आणि नीट पाणी घालून वाढवलेलें पीक प्राप्त होतें, तसेंच त्यालाहि सर्व फळें प्राप्त होत असतात.

"अरे, हा सूर्य जो उगवत असतो, त्यालासुद्धां रात्रीनें पसरून ठेवलेला जो दाट काळोख त्याचा नाश केल्याखेरीज उदय पावतां येत नसतें. त्याचप्रमाणें अविचाराचें पटल दूर

सारल्याशिवाय कोणालाहि आपली उन्नति करून घेतां येणार नाहीं. माणूस स्वतः बलवान् असला पण रागामुळें त्याची सर्व विचारशक्ति लुप्त झालेली असली, तर त्याचा नाशच होतो. चंद्र हा कलायुक्त म्हणजे सामर्थ्यसंपन्न जरी असला, तरी क्षयपक्षांत त्याचा नाश होतच असतो. म्हणून मनुष्यानें योग्य वेळेलाच नम्रता प्रगट करावी आणि योग्य वेळेलाच कठोरपणा प्रगट करावा. अशा प्रकारें वर्तन केल्यानेंच सूर्य जसा पृथ्वीवर आपल्या तेजानें राज्य करीत असतो, त्याप्रमाणें तोहि सर्वांवर राज्य करीत राहील.

"अरे, ही संपत्ति का कोठें कायमची राहात असते? माजलेला हत्तीप्रमाणें मोकाट सुटलेलीं हीं इंद्रियें, त्यांना कसें ताब्यांत ठेवणें शक्य होईल? शरदृतूंतील अभ्रें का कोठें स्थिर राहातात? खरें म्हणजे जे कोणी पुरुष आपल्या शरीरांतील रिपूंना आपल्या ताब्यांत आणीत नसतात, तेच पुरुष लक्ष्मीला चंचलतेचा डाग लावीत असतात. तितिक्षा म्हणजे सहनशीलता, त्यांसारखें शत्रूंना कह्यांत आणणारें दुसरें साधन नाहीं. असें पाहा, आपण ज्यांच्याशीं मर्यादेनें वागत आहोंत, आपला प्रेमसंबंध ज्यांच्याशीं जणुं जन्मापासूनच आहे, ते वृष्णि कुलांतील वीर आपणांला सोडून सुयोधनाकडे कसे बरें जातील? त्याचे जे आज मित्र आहेत, आणि आज जे त्याच्या मर्जीप्रमाणें वागत आहेत, ते सर्व आपल्या नम्रतेमुळेंच त्यापासून आपोआप फुटून निघतील.

आणि आपण जर आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें मर्यादा पाळून राहिलों, तर सूर्य ज्याप्रमाणें कमळाच्या पाकळ्यांना विस्तारवितो, त्याप्रमाणेंच ते आज मिटून राहिलेले लोक आपोआप फुटून बाहेर पडतील.

"राजे लोकांच्या प्रधानमंडळांतील यत्किंचित्‌हि असणारी फाटाफूट त्याचा नाश करण्यास कारणीभूत होते. झाडांच्या शाखांमधील संघर्षानें उत्पन्न होणारा लहानसाहि अग्नि त्या सर्व झाडाला जाळून टाकीत असतो. झाडांच्या मुळ्यांनीं पोखरून गेलेले तीर नदीच्या पुरामुळें जसे वाहून जात असतात, तसेंच आंतून आणि बाहेरून पोखरून निघालेलें राजमंडळ असेंच वाहून जात असतें. म्हणून आपण या वेळीं शांतता धारण करणें हेंच योग्य होय."

अशाप्रकारें धर्मराज भीमाला न्यायमार्ग समजावून सांगत असतांनाच भगवान् व्यास महर्षि तेथें प्राप्त झाले. धर्मराजानें त्यांची यथायोग्य पूजा केली, आणि त्यांची 'काय आज्ञा आहे,' याची प्रतीक्षा करीत तो त्यांच्या शेजारीं उभा राहिला. चंद्राच्या शेजारीं असलेला गुरु ग्रह जसा शोभावा, त्याप्रमाणें व्यास महर्षींच्या शेजारी असलेला तो युधिष्ठिर शोभून दिसत होता.

युधिष्ठिरानें मोठ्या आदरानें विचारल्यावर महर्षि व्यास म्हणाले-"तुम्ही पांडव व ते कौरव, हे दोघेहि मला सारखेच. तरीहि पण तुमच्या चांगुलपणामुळें माझा ओढा तुमच्याकडे

जास्त आहे. तुम्ही त्याच राजाचीं लेकरें नाहींत काय? सुयोधनापेक्षां तुम्ही अधिक गुणवंत नाहींत काय? त्यानें तुम्हांस असें टाकून द्यावयास नको होतें.

"कर्ण इत्यादिक प्रबळ वीर त्याच्या सैन्यांत आहेत. त्यामुळें ही राज्यलक्ष्मी तेथून निघून जाण्यास जरा घाबरत आहे. पण अयोग्य प्रकारचीं कृत्यें हीं भयंकर संकटें उत्पन्न करण्याला कारण होत असतात. त्याच्या उलट तुझी वागण्याची रीत आहे. तूं या तुझ्या विपत्तींतसुद्धां गुणावरच प्रेम प्रगट केलें आहेस.

"पण या संदर्भांत मला असें सांगावयाचें आहे कीं ही पृथ्वी पराक्रमानेंच मिळवावयाची असते. तुझा शत्रुपक्ष अस्त्र इत्यादिकांनीं तुझ्यापेक्षां बलवान् आहे. म्हणून तूंहि अधिक तेजस्वी शस्त्रें मिळवण्याची काळजी करावीस. कारण ज्याच्याजवळ श्रेष्ठ शस्त्रें असतात, त्यालाच विजयश्री रणांगणांत माळ घालीत असते.

"तुम्ही पांडव बलवान् नाहींत, असें म्हणतां येत नाहीं. तरी पण या तुमच्या शत्रूंच्या वीरांकडे लक्ष टाक. हा भीष्म. यानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करणाऱ्या परशुरामाचाहि पराभव केला. तो तुमच्याविरुद्ध धनुष्याचा टणत्कार करीत उभा राहिला असतां, कोणाच्या मनांत भीति उत्पन्न होणार नाहीं? तसाच हा गुरु द्रोण. हा तुमच्यावर रणांगणांत बाणांचा पाऊस पाडील. तो म्हणजे जगाला जाळून भस्म

करावयास तयार झालेला जणुं प्रळयाग्नीच. त्याला रणांगणांत कोण बरें तोंड देईल ? तसेंच हा कर्ण. यानें आपल्या धैर्याच्या योगानें जामदग्न्य परशुरामाला प्रसन्न करून घेतलें. मृत्यूला-सुद्धां त्यापासून भीति वाटते मग इतरांची कथा काय ?

"तेव्हां मला सांगावयाचें एवढेंच कीं, या बलाढ्य वीरांना जर जिंकावयाचें असेल, तर या अर्जुनानेंच आपली शक्ति आणखी वाढविली पाहिजे. मी त्याला विद्या देईन. तिच्या सामर्थ्यानें त्यानें हिमालयावर जाऊन तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न करून घ्यावें. तें जास्त योग्य. तिकडे त्यास नेण्यासाठीं एक यक्ष मी पाठवून देतों. त्याच्याबरोबर तो जाईल."

इतकें बोलून व्यास महर्षि निघून गेले. कांहीं क्षणानंतर व्यासांनीं पाठवून दिलेला यक्ष तेथें येऊन पोहोंचला. युधिष्ठिरानें अर्जुनास त्याच्याबरोबर जाण्यासाठीं अनुज्ञा दिली.

अर्जुन तेथून निघण्यापूर्वीं द्रौपदीला भेटण्यासाठीं आणि तिचा निरोप घेण्यासाठीं गेला. त्या वेळीं द्रौपदीची फारच अनुकंपनीय अवस्था झाली. तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. पण ते अश्रु तिनें जमिनीवर पडूं दिले नाहींत. कारण पति प्रवासास निघाला असतां पत्नीनें रडणें, हें अशुभ समजलें गेलें आहे. द्रौपदी त्याहि अवस्थेंत त्याला म्हणाली—

"महाराज, शत्रूंनीं नाहींशा केलेल्या यशाला पुनः उद्धरून काढण्यासाठीं आपण जात आहांत. आपण तपश्चर्येला जात आहांत; तर आमच्या विरहानें आपण कष्टी होऊं नये. यश मिळविण्यासाठीं, सुख मिळविण्यासाठीं किंवा सामान्य माणसांपेक्षा कांहींतरी वरचढ होण्यासाठीं जे प्रयत्न करीत असतात, आणि जे बावरून गेलेले नसतात, त्यांना ही जयसिद्धि स्वतः होऊन प्राप्त होते. आपणांसारख्या तेजस्वी पुरुषांना मान हा प्राणांपेक्षांहि अधिक प्रिय असतो. आपला अपमान झालेला आहे. त्याची आठवण जरी झाली, तरी तीव्र दुःख होतें. मग तो तसला पुन्हां सोसणें कशाला? आपल्या विरहानें तो माझा अपमान पुन्हां नवीन उत्पन्न झाल्यासारखा होणार आहे. पण मी तो सहन करीन. आपण एकटे आहांत. अत्यंत कल्याणकारी ठिकाणीं जरी असलांत, तरी एकटे आहांत. तरी आपल्या हातून आपल्या तपश्चर्येमध्यें कसलाहि प्रमाद घडूं नये. महर्षींचें सांगणें आपल्या हातून कृतींत उतरावें, आमचेहि मनोरथ आपण पूर्ण करावेत. आपण परत याल तेव्हां मी आपणांस अत्यंत दृढ आलिंगन देण्याची इच्छा करीत आहें."

अशा प्रकारें द्रौपदीचा निरोप घेऊन अर्जुन निघाला. तेथून हिमालयावरील आपल्या तपःसाधनेच्या आश्रमाकडे जात असतांना यक्षानें त्याचें मन रमावें, आणि त्यास प्रवास कंटाळवाणा वाटूं नये म्हणून नुकत्याच प्राप्त झालेल्या शरदृतूचें वर्णन करावयास सुरुवात केली:

" या वेळेला हें धान्य पिवळसर होऊन पक्व होत आहे. या नद्या उच्छृंखलता सोडून देऊन वहात आहेत. ही पृथ्वी कोरडी झालेली आहे. तिच्यावरील चिखल नाहींसा झालेला आहे.

हे पांढरे पांढरे बगळे यावेळीं उडत नसतात; ढगांवर इंद्रधनुष्यें पडलेलीं नसतात; तरीहि पण हें आकाश सुंदर दिसत नाहीं असें नव्हे. कारण मूळच्याच सुंदर असणाऱ्या वस्तूंना आणखी शोभा आणणाऱ्या वस्तूंची कांहीं अपेक्षा असत नाहीं. ढग नाहींसे झाल्याकारणानें या दिशा कृश झाल्यासारख्या दिसत आहेत. ते ढग तेव्हां विजांनीं चमकत होते. पण आतां तेच ढग पांढरे फटफटीत पडले आहेत. तरीहि या दिशा शोभत नाहींत असें नाहीं."

अशाप्रकारें वर्णन करीत तो यक्ष अर्जुनाला बरोबर घेऊन त्या श्रेष्ठ पर्वताजवळ प्राप्त झाला. पाहातां पाहातां त्यानें इतकें दूरचें अंतर कापलें.

मेरु पर्वताला जिंकण्यासाठींच कीं काय, किंवा कांहीं इर्षेनें दिशांचीं टोकें पाहण्यासाठीच कीं काय किंवा आकाश-मार्गाला अडवून टाकण्यासाठीं कीं काय, तो हिमालय पर्वत इतका उंच झालेला होता. त्याची एक बाजू सदोदित सूर्यानें प्रदीप्त झालेली होती; तर दुसरी बाजू सदोदित रात्रीच्या काळोखानें भरून गेलेली होती. हत्तीचें कांतडें पांघरलेल्या शंकरानें हास्य केलें असतां जसें दिसलें असतें, त्याप्रमाणें

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. ८१८४५२ नों. दि .........
(२१)
दि. ...९१.९१. क्र. .........

तो पर्वत एका बाजूला प्रकाशित, आणि दुसऱ्या बाजूला तपोमय असा दिसत होता. पृथ्वी, आकाश आणि स्वर्ग येथें राहाणाऱ्या लोकांनीं तेथें आपलीं घरें केलीं होतीं. परंतु तीं एकमेकांना कधीं दिसलीं नाहींत, इतकीं तीं दूर दूर होतीं. शंकरानें जणू कांहीं आपलें सामर्थ्य प्रगट करण्यासाठीं विशाल जगताचा प्रतिनिधि म्हणूनच हा पर्वत निर्माण केलेला होता.

त्यावर रमणीय असे भूप्रदेश होते. त्यांत उंच उंच गोपुरें होतीं. सुरस्त्रियांनींहि जेथें उपभोग घेतलेला आहे, असे लतामंडप होते. ते मंडप रत्नांच्या तेजोमय किरणांनीं तळपत होते. त्यावर वेगवान नद्या होत्या.

ज्यांमध्यें रत्नें नाहींत, अशीं शिखरें तेथें नव्हतीं. ज्या दऱ्यांमध्यें लता नाहींत, अशा दऱ्या नव्हत्या. कमळें नसतील अशा नद्या नव्हत्या. ज्यावर फुलें लगडलेलीं नव्हतीं, अशीं झाडें तेथें नव्हतीं.

यक्ष म्हणाला– " या ठिकाणीं तो भवानीपति शंकर राहातो. त्याच्याशीं तुलना करण्यासारखें या जगांत दुसरें कांहींहि नाहीं. या ठिकाणीं तूं राहा. तुझे इंद्रियरूपी अश्व तुला हिरावून भलत्या मार्गास न नेवोत. हे लोकपाल तुला तपश्चर्येमध्यें बल देवोत. तुला तुझ्या कृत्यांत यश प्राप्त होवो. "

असा आशीर्वाद देऊन तो यक्ष निघून गेला. आणि अर्जुन

त्या पर्वतावरील आश्रमांत येऊन पोहोंचला. त्यानें तेथें उग्र तपश्चर्या करण्यास आरंभ केला.

त्याच्या उग्र तपश्चर्येची बातमी यक्षांकडून इंद्राच्या कानावर गेली. त्याला हें सर्व मनोमन माहीत होतें, पण आपल्या मुलाची स्तुती ऐकून तो संतुष्ट झाला. तरीहि पण तपश्चर्येंतील त्याची निष्ठा किती आहे, हें तावून सुलाखून पाहाण्यासाठीं त्यानें अप्सरांच्या समुदायाला त्याच्याकडे पाठवून दिलें.

आज्ञेप्रमाणें त्या अप्सरा जेथें अर्जुन तप करीत होता तेथें गेल्या. त्यांनीं त्यास भुलविण्याची पराकाष्ठा केली, पण अर्जुन भाळला नाहीं. त्या सर्वजणी निराश होऊन परत गेल्या. त्यांनीं आपला अनुभव इंद्राला सांगितला. इंद्र वरकरणी रागावून बोलला, पण मनांतल्या मनांत तो अत्यंत संतोष पावला. अखेरीस 'आपण स्वत:च त्याचें मन वळविण्यासाठीं जावें' असा विचार करून तो निघाला आणि लगेच अर्जुनापाशीं येऊन पोहोंचला. त्यानें एका वृद्ध ब्राह्मणाचें रूप धारण केलें होतें. तो वाटचालीनें दमून गेलेला होता.

तो ब्राह्मण-वेषधारी इंद्र अर्जुनाला म्हणाला—

"तूं या तारुण्यांत तपश्चर्येला आरंभ केलेला आहेस, तें अगदीं योग्य आहे. कारण माझ्यासारखा जख्खड म्हातारा-सुद्धां विषयांमध्यें गुंतून गेलेला असतो. हें यौवन क्षणभंगुर आहे–जणुं कांहीं शरद्ऋतूंतील ढग. आणि हे विलास प्रथमत:

रमणीय वाटतात, पण मागाहून अत्यंत पश्चात्ताप करविणारे असतात. म्हणून मला आनंद वाटत आहे कीं तूं हा योग्य कल्याणमार्ग स्वीकारला आहेस. पण मला या एकाच वस्तूबद्दल शंका येत आहे कीं हा तुझा वेष संन्याश्याला शोभणारा नाहीं. कसा म्हणशील तर पाहा—लढाईला तयार झालेल्या वीरांप्रमाणेंच तूं हें कवच धारण केलेलें आहेस. तपस्वी तर केवळ वल्कलें नेशीत असतात. हे दोन मोठे भाते आणि हें धनुष्यहि तुझ्याजवळ आहे. जणुं कांहीं यमराजाचा दुसरा हातच अशी ही तलवार तुझ्याजवळ आहे. तिच्या योगानेंच असें समजून येतें कीं तूं कांहीं यति नाहींस. हीं आयुधें कोणीकडे आणि मुनीश्वर कोणीकडे ? जो कोणी प्राणिमात्रांचा द्वेष करून चंचल असणारी लक्ष्मी स्वीकारीत असतो, तो मनुष्य समुद्राप्रमाणें आपणांस पोषक असणाऱ्या नद्यांना नष्ट करून टाकण्यास सज्ज झालेला असा ठरतो."

तो पुढें म्हणाला—" ही विपत्ति आणि संपत्ति सारखीच. चांगले लोक साहाय्याला असले, म्हणजे ती प्राप्त होते. पण ज्यांच्यापासून खेद होतो, ज्यांच्यापासून भीति वाटत असते, त्या या संपत्तिविपत्तीविषयीं काय सांगावें ? चांगल्या सज्जन माणसाच्या सहवासाला राहूनहि ही लक्ष्मी चंचलच असते. त्या सज्जन माणसांचें मनहि त्या बिथरवून टाकीत असतात. तेव्हां लढाईच्या योगानें संपत्ति मिळविण्याची इच्छा तूं सोडून दे. जिंकण्यास कठिण असलेलीं हीं इंद्रियें तूं जिंकून टाक. ही

इंद्रियें जिंकलीस कीं सर्व जग तूं जिंकलेंस. तेव्हां मला सांगावयाचें इतकेंच कीं या एकान्त पर्वतामध्यें ही भागीरथी नदी वहात आहे. या पवित्र स्थळीं तूं याप्रमाणें शस्त्र परजून राहूं नयेस. तुझ्या मुक्तीला त्यामुळें बाध येत आहे."

तें बोलणें ऐकून घेतल्यावर अर्जुनानें उत्तर केलें, "महाराज, आपण जें कांहीं म्हणालांत, तें अगदीं योग्य आहे. अशा रीतीचें सुसंबद्ध कोणी बोलणार नाहीं. पण आपणांस पूर्वापर संबंध नीटसा माहिती नसल्याकारणानें आपण याप्रमाणें मला मुनिधर्माचा उपदेश करीत आहांत. ज्याला अगोदरच्या संदर्भाची माहिती नसते, तो माणूस जरी साक्षात् बृहस्पति असला तरी त्याचें भाषण सफळ होत नाहीं. या तुमच्या भाषणाला मी पात्र नाहीं. मी क्षत्रिय आहें. पंडूचा मुलगा आहे. माझें नांव धनंजय. आमच्या शत्रूंनीं आम्हांस हुसकून लावलें आहे. मी माझा थोरला भाऊ जो युधिष्ठिर त्याच्या आज्ञेंत राहात आहें. कृष्णद्वैपायन जे व्यास महर्षि त्यांच्या आज्ञेवरून मी हें असलें व्रत इंद्राला प्रसन्न करून घेण्यासाठीं आचरीत आहें.

"आमचा राजा फांसे खेळला. त्यांत त्यानें सर्व कांहीं पणाला लावून हरवून टाकलें. आमची पत्नी जी द्रौपदी तिचा अपमान करण्यांत आला. त्याबद्दलचा जळफळाट मनांत होत आहे. शक्तीनें विकल झाल्याकारणानें वांकून गेलेलें, बळच नसल्याकारणानें अत्यंत क्षुद्र बनून राहिलेलें

२०९६५
वाङ्मय ५२८

गवत आणि मानहीन झालेला माणूस यांची गति सारखीच. जोंपर्यंत लक्ष्मी त्याच्याकडे असते, तोंपर्यंतच त्याचें यश स्थिर असतें. आपला मान राखलेला आहे तोंपर्यंतच तो पुरुष. सभेमध्यें गणती केली जात असतांना ज्याच्याशिवाय दुसरीकडे बोट केलेंच जात नाहीं, तोच खरोखर पुरुष. त्याचाच जन्म खरोखर सफळ झालेला आहे. त्याच्याच योगानें वंश वाढला असें होतें. त्याचें धवल यश चंद्राच्या मंडलालाहि ग्रासून टाकीत असतें.

" महाराज, मी काय म्हणतों तें ऐका—मी सुख मागत नाहीं. समुद्रावरील चंचल असणाऱ्या लाटेप्रमाणें असणाऱ्या संपत्तीची मी इच्छा करीत नाहीं. किंवा शाश्वत पद जें कांहीं आहे, त्याचीहि मला पर्वा नाहीं. लोक मला हंसोत, माझ्या बुद्धीची कांहीं चूक असेल किंवा अयोग्य ठिकाणीं प्रयत्न केल्याकारणानें माझे श्रम व्यर्थ गेले असतील; आपणांसहि कांहीं वेळेला माझ्याविषयीं घृणा वाटत असेल. पण माझें मत एकच आहे कीं, निर्वाण हें जयमार्गाला अडथळाच आहे. म्हणून मी अशी प्रतिज्ञा करीत आहें कीं हे ढग जसे या पर्वतराज हिमालयावर येतात आणि त्यांत मिसळून जातात, तसा मीहि येथें विलीन तरी होईन किंवा इंद्राला प्रसन्न करून माझी झालेली अपकीर्ति तरी मी नाहींशी करून टाकीन."

अर्जुनाचें हें प्रांजल व तेजस्वी बोलणें ऐकल्याबरोबर इंद्र प्रगट झाला. त्यानें आपल्या बाहूंत अर्जुनाला कवटाळलें. "शंकराला तूं प्रसन्न करून घे. तो प्रसन्न झाल्यानंतर माझ्यासह इतर लोकपालांपेक्षांहि तुझें बळ अतुलनीय होईल. मग तूं शत्रूकडून आपली लक्ष्मी परत मिळविशील." असा आशीर्वाद देऊ इंद्र गुप्त झाला.

इंद्राच्या सांगण्याप्रमाणें अर्जुनानेंहि उग्र तपश्चर्या करण्यास आरंभ केला. त्याची परीक्षा पाहण्यासाठीं भगवान् शंकर किरात–वेष घेऊन आपल्या किरातसैन्यासह अर्जुन जेथें तपश्चर्या करीत होता, तेथें आले.

याच सुमारास एक महाभयंकर रानडुकर अर्जुनावर चालून आलेला होता. जणुं कांहीं तो अर्जुनाला लढण्याला आव्हानच करीत होता. त्याला पाहून अर्जुनाच्या मनांत निरनिराळ्या कल्पना उत्पन्न झाल्या. 'हा कोणी राक्षस असावा काय ? हा सर्व पर्वत जणुं हलवून टाकीत आहे. हा त्या सुयोधनाचें प्रिय करणारा कोणी रानडुकराचें रूप धारण करून आलेला तर नसेल ना? किंवा खांडव वनांतून सुटलेला तो अश्वसेन नाग तर हा नसेल ? मला तर भगवान् व्यासांनीं असें सांगितलें आहे कीं 'आपली जागा न सोडतां तूं तपश्चर्या करीत राहा.' पण हा तर माझ्यावर चालून येत आहे. तेव्हां याचा प्रतिकार करणेंच योग्य आहे.

असा विचार करून अर्जुनानें आपलें धनुष्य सज्ज केलें, त्यावर बाण चढविला आणि तो त्या रानडुकराच्या अंगावर सोडला.

याच सुमारास तो श्रेष्ठ किरातहि आपल्या सैन्यासह तेथें येऊन ठेपला होता. त्यानेंहि आपला बाण त्याच रानडुकरावर सोडला. या दोन बाणांच्या मध्यें तो डुकर सांपडला आणि तत्काळ गतप्राण झाला.

अर्जुनाला आनंद वाटला. आणि ज्या बाणानें एवढा पराक्रम केला तो आपला बाण आपल्याजवळ असावा, अशा इच्छेनें अर्जुन त्या मरून पडलेल्या डुकराजवळ गेला. त्यानें तो बाण उपसून काढला. त्याच वेळीं त्या किरात-सेनापतीचा एक दूत तेथें आला. त्यानें अर्जुनास हटकलें. तो म्हणाला.–

"हा बाण आमच्या सेनापतींचा आहे, तुझा नाहीं. तुला कौतुक म्हणून तो बाण पाहिजे असल्यास तो तूं घे, पण अगोदर आमच्या सेनापतीची अनुज्ञा माग. तो उदार आहे. तो आपला बाण सहज तुला देईल. पण त्याला विचारल्याशिवाय हा बाण घेणें म्हणजे चौर्य होय. तूं विनंती केल्यास तो तुला क्षमाहि करील."

त्यावर अर्जुनानें उत्तर दिलें–"हा बाण माझा आहे. तुझ्या सेनापतीचा बाण घेण्याची मला कांहीं जरूरी नाहीं. त्याच्याकडे इतके आणि असले बाण कोठून असणार? त्याला पाहिजे असल्यास मीच त्याला हा बाण देईन. आणि

५४५२ (२८)
बावी

हा पाहा हा येथें एकच बाण आहे. दुसरा बाण दिसतच नाहीं. त्यानें बाण सोडलाच नसेल. सोडला असल्यास तो या रानडुकराला लागलेला नाहीं. दुसरीकडेच कोठेंतरी नेम चुकून तो पडला असेल. माझा बाण कधीं चुकलेला नाहीं. तेव्हां तुझ्या सेनापतीला तूं म्हणतोस त्याप्रमाणें मीं विनंती करण्याचें कांहींच कारण नाहीं."

याप्रमाणें प्रथम वाग्युद्धाला सुरुवात झाली; आणि मागाहून त्या दोघांत प्रत्यक्ष लढाईला सुरुवात झाली. दोघांची मोठी घनघोर लढाई झाली. त्यांत अर्जुनाचा पराभव झाला. त्याचे अक्षय भात्यांतील बाण संपले, धनुष्य तुटलें, तलवार मोडली; आणि मुष्टियुद्धाची पाळी आली. त्यांतहि तो हरला. शेवटीं त्यानें शंकराची प्रार्थना केली. मस्तक नम्र केलें. शंकरहि त्याच्या पराक्रमावर प्रसन्न झाले आणि मग त्यांनीं त्याला आपलें 'पाशुपतास्त्र' दिलें. वरहि दिला कीं, "तूं आतां जा आणि आपल्या सर्व शत्रूंवर विजय मिळव." त्यावेळीं सर्व देवांनींहि त्याची प्रशंसा केली.

शंकराकडून अस्त्रप्राप्ति झालेला तो अर्जुन परत आला आणि त्यानें धर्मराजाला मोठ्या आदरानें नमस्कार केला.

२०९६६
IRBK-0105452
IRBK-0105452